नि. दि. दा. क्र.**२७/२०२४**
शोभा वि. शासन व इतर
नि.क्र. ०/५६

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांचा सरतपास विद्वान वकिल श्री. एस. एच. पटेल यांचेमार्फत शपथेवर सुरू:-</u>**

१०. तहसील कार्यालयात प्रकरण चालु असताना दि.२४/०३/२०२२ रोजीच्या पंचनाम्याला मी हजर होतो. त्यावेळी माझ्या शेतामध्ये सर्वे क्र. १९६/अ, १९६/ब मौजे सारोळा याठिकाणी तहसीलदार साहेब, मंडळ अधिकारी पंचनाम्यासाठी आले होते. त्यांनी माझ्या शेतामध्ये फिरुन बघितले व तेथे बसून पंचनामा तयार केला. मला यादी नि.क्र. ४ सोबत अ.क्र. ४ वर दाखल केलेला पंचनामा दाखवला असता त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५८** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ३ ते ५ तर्फे विद्वान वकील श्री. एस. सी. बिराजदार यांचेमार्फत सुरुः-</u>**

११. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १९६/अ आणि १९६/ब मधील जमिनी या माझ्या वडीलोपार्जीत जमिनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १९६/अ आणि १९६/ब मधुन नाला गेला आहे. मी सर्वे क्र. १९६/अ आणि १९६/ब चे जुने आणि नवे ७/१२ उतारे पाहिले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, एकुण क्षेत्रापैकी दोन्ही सर्वे क्रमांकामध्ये प्रत्येकी ७ गुंठे क्षेत्र पोटखराब आहे. हे म्हणणे खरे आहे की, तशी दोन्ही सर्वे क्रमांकाच्या ७/१२ उता-यामध्ये नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही सर्वे क्रमांकामधील नाल्याचे क्षेत्र पोटखराब्याचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व प्रतिवादी क्र. ३ नाल्याचे क्षेत्रफळ सोडुन आम्ही शेती करतो. हे म्हणणे खरे नाही की, नाल्यामधुन कन्हेरी पायमार्ग गेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही सर्वे क्रमांकामध्ये नाला पायमार्ग गेल्याची ७/१२ उता-याच्या इतर हक्काच्या रकान्यामध्ये नोंद आहे.

१२.	हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही सर्वे क्रमांकाच्या ७/१२ उता–यामध्ये माझ्या जमिनीतुन नाला पायमार्ग गेल्याने तशी नोंद करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे त्यांच्या शेतामध्ये जाण्यासाठी नाल्याच्या रस्त्याचा वापर करतात.

१३.	हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी नाला रस्त्याने जाऊ नये म्हणुन मी त्या ठिकाणी काटयाडया टाकुन रस्ता अडवला. हे म्हणणे खरे आहे की, मी काटयाडया टाकुन रस्ता अडवला म्हणुन प्रतिवादी क्र. ३ ने माझ्या विरूध्द पोलीस ठाण्यात अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे तक्रार करू नये म्हणुन माझ्या विरूध्द पोलीस ठाण्यात कलम १०७ प्रामणे कार्यवाही करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ३ ने माझ्या विरूध्द तहसील कार्यालयात नाल्याचा रस्ता खुला करून मिळावा म्हणुन अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या कालावधीत मी माझी सर्वे क्र.१९६/ब मधील जमिन विठ्ठल काळे यांना विकली होती.

१४.	प्रतिवादी क्र. ३ यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दि.०७/०४/२०२१ रोजी मंडळ अधिकारी श्री भुजबळ हे माझ्या शेतामध्ये आले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्यावेळेस आम्ही सर्व लातूर येथे होतो. त्यादिवशी मंडळ अधिकारी श्री भुजबळ यांनी सर्वे क्र.१९६/अ मध्ये जाणारा नाला रस्ता प्रतिवादी वापरतात असा पंचनामा केला किंवा नाही याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०७/०४/२०२१ रोजी मंडळ अधिकारी यांनी पंचनामा केला त्यावेळेस सर्वे क्र.१९६/अ मधील ८१ आर जमिन ही विठ्ठल काळे यांच्या नावाने होती. हे म्हणणे खरे आहे की, मंडळ अधिकारी श्री भुजबळ यांनी पंचनाम्यासाठी हजर राहण्याकरिता मला व विठ्ठल काळे यांना नोटीसा दिल्या होत्या. त्यादिवशी विठ्ठल काळे यांनी पंचनाम्यावर सही केली किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी पंचनाम्याला हजर होतो व मी पंचनाम्यावर सही केली नाही.

१५.	हे म्हणणे खरे आहे की, दि.२४/०३/२०२२ रोजी मंडळ अधिकारी व तहसीलदार माझ्या शेतामध्ये आले होते त्यावेळी लहु डावकरे, मी स्वत:, प्रकाश लांडे

आणि दत्तात्रय काळे असे हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, लहु डावकरे यांनी ते व प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे त्या नाल्याच्या रस्त्यावरून जा–ये करत होते व मी सदरचा रस्ता अडवला असे पंचनाम्याच्यावेळी सांगितले, त्यानुसार पंचनामा लिहण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीला व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या जमिनीला जास्त पाऊस आल्याने चवाळ(मर्यादेपेक्षा जास्त पाणी साचणे) लागतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या जमिनीला लागुन एरंडी–कन्हेरी रस्ता जास्त पाऊस झाला की पुर्ण पाण्याखाली जातो.

१६. हे म्हणणे खरे आहे की, तसहील कार्यालयात कार्यवाही चालु होती त्यावेळी मी व माझी पत्नी पैरवीसाठी हजर होतो. दि.२४/०३/२०२२ रोजी महसुल अधिकारी स्थळ पाहणी करून गेले होते त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ याने पावसाळ्यात स्थळ पाहणी करावी असा अर्ज तहसील कार्यालयात दिला होता किंवा नाही याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुन्हा दि.१९/१०/२०२२ रोजी तहसीलदार हे स्थळ पाहणी करण्याकरिता आले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांनी रस्ता खुला करून दयावा म्हणुन मागणी केली होती त्या रस्त्याची पाहणी तहसीलदार यांनी केली, तसेच कन्हेरी रस्त्याची पाहणी त्यांनी केली. हे म्हणणे खरे आहे की, तहसीलदार यांनी पावसाळ्यामध्ये कन्हेरी रस्ता वापरता येत नाही व नाल्याचा रस्ता वापरता येतो असा पंचनामा केला.

१७. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा शैलश दिनकर लांडे हा पंचनाम्याच्या वेळेस हजर होता. मला यादी नि.क्र. ४ सोबत अ.क्र. ५ वरिल दि.१९/१०/२०२२ रोजीचा पंचनामा दाखवला असता त्यावर माझ्या मुलाची सही आहे. सदर पंचनामा वादी व प्रतिवादी यांना मान्य असल्याने त्यास **नि.क्र. ५९** देण्यात येते. तहसीलदार यांनी प्रतिवादी क्र. ३ यास पावसाळ्यामध्ये नाल्याच्या पोटखराब हिस्स्यातुन रस्ता दिला आहे असा आदेश दिला आहे. तो खोटा आदेश आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर आदेशाविरूध्द मी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील केले. हे म्हणणे खरे नाही की, उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार यांनी दिलेला आदेश

कायम ठेवला. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली नाही.

१८. हे म्हणणे खरे नाही की, पोट खराब मधील क्षेत्र वापरात यावे म्हणुन प्रतिवादी क्र. ३ यास तहसीलदार यांनी दिलेला रस्ता मी अडवला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना त्यांच्या शेतामध्ये जाण्याकरिता कन्हेरी रस्ता उपलब्ध आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे माझ्या जमिनीतुन ट्रक्टर, बैलगाडया घेऊन जात आहेत व जमिनीचे, पिकांचे नुकसान करत आहेत असे मी माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नाल्याच्या पश्चिम बाजुने जुना रस्ता अस्तित्वात असतानादेखील मी सदर रस्ता अस्तित्वात नाही असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पत्नीने संगणमत करून प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने खोटा दावा दाखल केला आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

**(प्रतिवादी क्र. १ व २ विरूध्द प्रकरणाची सुनावणी एकतर्फे चालत असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे उलटतपास नाही. )**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.11.07 16:35:12 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–०७.११.२०२५. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.